**मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांची बागलाण तालुक्यास भेट. दि. 28-11-2025**

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा आढावा आणि सोमपूर ग्रामपंचायतीतील 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले' अभ्यासिकेचे उद्घाटन.**



**नाशिक :** जिल्हा परिषद नाशिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी बागलाण तालुक्याचा दौरा करून विविध विकासकामांचा सखोल आढावा घेतला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, गतीमान कामकाज आणि गावपातळीवरील प्राधान्यक्रम याचा त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, बागलाण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अतुल पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंचायत राज व्यवस्थेची गुणवत्ता वाढवणे, गावांचे सर्वांगीण विकास आराखडे अधिक सक्षम करणे आणि नागरिकाभिमुख प्रशासनाची पातळी उंचावणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश होता.

दौऱ्यात सीईओ पवार यांनी सोमपूर ग्रामपंचायत येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या पुढाकारातून नव्याने उभारण्यात आलेल्या 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका'चे उद्घाटन केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सुरक्षित, शांततामय आणि संसाधनयुक्त वातावरण मिळावे या हेतूने जिल्हा परिषदेमार्फत सुरू झालेल्या 'गाव तेथे अभ्यासिका' या उपक्रमांतर्गत ही अभ्यासिका उभारण्यात आली आहे. लोकसहभाग, ग्रामपंचायतचा सक्रिय पाठिंबा आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे ही सुविधा अल्पावधीत पूर्ण झाली. उद्घाटनावेळी बोलताना पवार यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी आता गावातच स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण आणि शालेय अभ्यासाची तयारी करू शकतात. ही सुविधा त्यांच्या भविष्यनिर्मितीस मोठा आधार ठरेल.

अभ्यासिकेत प्रकाशयुक्त व वातानुकूल वातावरण, अभ्यास टेबल-खुर्च्या, पुस्तक कपाटे, स्वच्छ शौचालये आणि सतत वीजपुरवठा यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, अभ्यासिका विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सकाळी व संध्याकाळी विस्तारित वेळेत खुली राहणार आहे. गावातील विद्यार्थी, पालक आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.

यानंतर प्रमुख अधिकाऱ्यांसोबत सीईओंनी विविध विभागांच्या बैठकांद्वारे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातील प्रगतीचा आढावा घेतला. पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, महिला-बालविकास, आरोग्य, स्वच्छता अशा प्रमुख क्षेत्रांतील प्रकल्पांचा वेग वाढवण्यासाठी आवश्यक निर्देश देण्यात आले. गावांच्या विकास आराखड्यातील प्रलंबित कामे त्वरित पूर्ण करण्यास त्यांनी संबंधित विभागांना मार्गदर्शन केले.